# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०७/२०२४

| | | |
|---|---|---|
| डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी<br>५१/४, प्लॉट नं.०८,लक्ष्मीपार्क,<br>जयसिंगपूर, ता.शिरोळ<br>जि.कोल्हापूर ४१६१०१ | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. अनेकांत एज्युकेशन सोसायटी,<br>C/O टी.सी.कॉलेज, बारामती, जि.पुणे<br><br>२. जयसिंगपूर कॉलेज,जयसिंगपूर,<br>ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | } | वि.प. |

अनेकांत एज्युकेशन सोसायटी, C/O टी.सी.कॉलेज, बारामती, जि.पुणे या शिक्षण संस्थेचे जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२२/०७/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये तक्रारदार यांनी खालीप्रमाणे तक्रार नमूद केली आहे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे शारीरीक शिक्षण संचालक म्हणून दि.०१/०९/२००५ पासून पूर्णवेळ सेवेत कार्यरत आहे. शारीरीक शिक्षण संचालक म्हणून माझी जबाबदारी आजअखेर विधिवत पार पाडत आहे. मी दि.२५/०२/२०२१ या दिनांकापासून प्राफेसर पदाच्या (Stage-5AGP 10000) पदोन्नतीसाठी पात्र आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या दि.०३/०४/२०२१ च्या परिपत्रकाप्रमाणे मी माझा प्रोफेसर पदाच्या पदोन्नतीचा प्रस्ताव महाविद्यालयामार्फत विहित शुल्क भरून विद्यापीठास सादर केला होता. विद्यापीठाने सदर प्रस्तावाची छाननी करून त्यास मंजूरी दिली होती.

दि.१२/०६/२०२४ च्या परिपत्रकानुसार स्टेज ५ च्या प्रोफेसर पदाच्या पदोन्नतीसाठी मुलाखतीस उपस्थित राहण्यासंदर्भात कळविलेनुसार मी दि.२९/०६/२०२४ रोजी मुलाखतीसाठी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत नियोजित कक्षामध्ये वेळेत उपस्थित होतो. या मुलाखतीच्या गठीत समितीमध्ये संस्था अध्यक्ष हे मुलाखत समितीचे अध्यक्ष असतात व प्राचार्यांची उपस्थिती अनिवार्य

असते. असे असतानादेखील मुलाखतीच्या दिवशी संस्था अध्यक्ष/प्रतिनिधी आणि प्राचार्य हे दोघेही जाणीवपुर्वक अनुपस्थित राहिल्यामुळे सदरच्या दिवशी माझी मुलाखत झाली नाही. त्यामुळे मी पदोन्नतीच्या लाभापासून वंचित राहिलो. माझे शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक नुकसान झाले आहे.

माझ्याच महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांच्या स्थाननिश्चितीच्या मुलाखतीस संस्था प्रतिनिधी व प्राचार्य प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून मुलाखत पार पाडली. मात्र माझ्या मुलाखतीच्यावेळी ठरलेल्या तारखेस उपस्थित राहण्यासंदर्भात तोंडी स्वरूपात व विनंतीवजा पत्राने पूर्वकल्पना देवून देखील जाणीवपूर्वक माझ्या मुलाखतीस अनुपस्थित राहून माझ्यावर अन्याय केला आहे. तरी हा अन्याय दूर करून पदोन्नतीचे सर्व लाभ पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर व्हावेत.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

आमच्या महाविद्यालयातील विनाअनुदानित विभागाच्या विषयाची मुलाखत दि.२९/०७/२०२४ रोजी पूर्वनियोजित केली होती. त्याची प्रत सोबत जोडली आहे. उमेदवार मुलाखतीस जास्त उमेदवार असल्यामुळे प्राचार्य व संस्थाचालक मुलाखतीमध्ये व्यस्त राहिले. सदर मुलाखत वरील विषयामुळे रद्द केली असती तर या सर्व उमेदवारांच्या भवितव्य व नोकरीचा प्रश्न निर्माण झाला असता त्यांचे अतोनात नुकसान झाले असते त्यामुळे सदर मुलाखतीस प्राचार्य व संस्थाचालकांना उपस्थित राहता आले. तरी या पुढील मुलाखतीस प्राचार्य व संस्थाचालक उपस्थित राहतील.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत प्रकरण आज रोजी समितीसमोर सुनावणीकरिता आले असता तक्रारदार स्वतः हजर होते आणि संस्थेतर्फे डॉ. महावीर अक्कोळे, सचिव, जयसिंगपूर स्थानिक समिती, जयसिंगपूर अधिकार पत्राने हजर होते. महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ. एस्. ए. मांजरे समितीसमोर स्वतः हजर होते. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार अशी मांडली की, दि. २५/०२/२०२१ या दिनांकापासून प्रोफेसर पदाच्या (Stage-5 AGP 10000) पदोन्नतीसाठी ते पात्र आहेत. विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार प्रोफेसर पदाच्या पदोन्नतीचा प्रस्ताव विहित शुल्क भरून महाविद्यालयामार्फत विद्यापीठास सादर केला होता. सदर प्रस्तावाची छाननी करून विद्यापीठाने त्यास मंजुरी दिली होती. परंतु संस्था अध्यक्ष व प्राचार्य सदर मुलाखती दिवशी जाणीवपूर्वक अनुपस्थितीत राहिल्याने मुलाखत झाली नाही व ते पदोन्नतीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. ते पदोन्नतीचे सर्व लाभ पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर व्हावेत.

उपरोक्त तक्रारदारांच्या तक्रारीबाबत संस्था प्रतिनिधी व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी महाविद्यालयामध्ये पूर्वनियोजित मुलाखती असल्याने तक्रारदारांच्या विद्यापीठातील मुलाखतीस उपस्थित

समितीसमोर मांडली. यावर तक्रारदार यांनी समितीसमोर असे कथन केले की, मुलाखतीच्या आदल्या दिवशी व मुलाखतीच्या दुसऱ्या दिवशी संस्था व प्राचार्य इतर मुलाखतीस विद्यापीठामध्ये हजर राहिले आहेत व त्यांच्या मुलाखतीस अनुपस्थित राहून त्यांचेवर अन्याय झाला आहे. तक्रारदारांच्या या कथनास संस्था प्रतिनिधी व प्राचार्य यांनी नकार दिलेला नाही.

समितीने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतले, तसेच तक्रारदार यांच्या मूळ तक्रार अर्जामध्ये मुद्दा क्र. १३ मधील प्राचार्य/विद्यापीठ/संस्थेचा अभिप्राय या रकान्यामध्ये प्राचार्य यांच्या सही शिक्क्याने उपरोक्त नमूद अभिप्राय दिला आहे. तसेच समितीसमोरील सुनावणी दरम्यान दि.२१/०८/२०२४ रोजी प्राचार्य, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर यांनी उपरोक्त आशयाचे पत्र सादर केले असून त्याचा योग्य विचार व्हावा अशी विनंती केली. तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांच्या स्थाननिश्चितीच्या मुलाखतीकरिता हजर राहणेबाबत तक्रारदार यांनी संस्थाचालक व प्राचार्य यांना पत्रव्यवहार केल्याचा दिसून येतो व मुलाखतीस उपस्थित राहून सहकार्य करणेबाबत विनंतीही केल्याचे दिसून येते. याबाबत समितीचे मत असे की, शिक्षकांच्या स्थाननिश्चितीचे प्रस्ताव व त्यासाठी घेतल्या जाणाऱ्या मुलाखती याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाही होणे आवश्यक असते. परंतु असे दिसून येते की, तक्रारदार यांनी संस्थाचालक व प्राचार्य यांना मुलाखतीवेळेस उपस्थित राहणेबाबत पत्रव्यवहार करूनदेखील संस्थाचालक व प्राचार्य मुलाखतीस उपस्थित राहिलेले नाहीत. संस्था व महाविद्यालयाने अनुपस्थितीबाबत दिलेले कारण देखील समाधानकारक नाही.

उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता समिती या निष्कर्षास येते की, संस्थाचालक व प्राचार्य तक्रारदार यांच्या मुलाखतीवेळेस गैरहजर राहण्याबाबत समाधानकारक कारणे देवू शकलेले नाहीत, परंतु उपरोक्त आशयाच्या पत्राने संस्थाचालक व प्राचार्य पुढील मुलाखतीस उपस्थित राहत असल्याबाबतची हमी दिली आहे. तसेच समितीसमोर तोंडी मान्य ही केले आहे. सबब तक्रारदार यांच्या मुलाखतीस संस्थाचालक व प्राचार्य उपस्थित राहत नसल्याबाबतच्या तक्रारीत कारण राहत नाही.

तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये त्यांचे पदोन्नतीचे सर्व लाभ पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर होणेबाबत केलेली विनंती या समितीस मान्य करता येणार नाही. कारण स्थाननिश्चितीचे लाभ देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही होत असते. शिक्षकांची स्थाननिश्चितीची कार्यवही कॅस समितीकडून केली जाते. सदर कॅस समिती विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट शासनाच्या निर्णयानुसार गठित केली जाते. या निर्देशानुसार पदोन्नतीबाबतची कार्यवाही केली जाते व ही बाब कॅस समितीच्या कार्यकक्षेत येते. शिखर संस्थेने व महाराष्ट्र शासनाने दिलेल्या

निर्देशनानुसार पदोन्नतीबाबतची कार्यवाही व पदोन्नती देण्याचे अधिकार कॅस समितीस असलेने प्रस्तुत समितीने त्याबाबत आदेश पारित करणे उचित होणार नाही. सबब समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. संस्थाचालक व महाविद्यालय प्राचार्य यांनी तक्रारदार यांचा प्रोफेसर पदाचा (Stage-5 AGP 10000) या पदोन्नतीकरिता तात्काळ फेरप्रस्ताव पाठविण्याबाबतची कार्यवाही करावी.
२. संस्थाचालक व महाविद्यालय प्राचार्य यांनी पुढील स्थानिश्चिती शिबीरात कोणतेही कारण न देता तक्रारदाराच्या मुलाखतीवेळेस प्रत्यक्ष हजर रहावे असा आदेश ही समिती पारित करित आहेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 0 4 SEP 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)